# इन्फंट इंडिया संस्थेच्या पुढाकाराने ५८ एचआयव्ही बाधित जोडप्यांचा फुलला संसार!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कंर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १९९ ■ सोमवार दि.७ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 199 ■ Monday Dt.7 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4



# पालक बाधित ; आनंदग्रामच्या ३० व्या व्हायरसमुक्त बाळाने घेतला जन्म

## इन्फंट इंडिया म्हणजेच आनंदग्राम प्रकल्पांने आधार दिला; शिक्षण सह आरोग्य सुविधा देऊन त्यांचा विवाह लावून देत नवे आयुष्यही दिले



- आनंदग्राम संस्था सुमारे दोन दशकांपासून एचआयव्ही बाधित मुलांसाठी काम करत आहे
- दत्ता व संध्या बारगजे या दांपत्याने या संस्थेच्या माध्यमातून बीडची ओळख देशभरात निर्माण केली
- आनंदग्राम संस्था आपल्या लेकींची बाळंतपणातही काळजी घेवून, त्यांचे बाळंतपण केले जाते!
- महाराष्ट्र एड्स नियंत्रण सोसायटी व बीड जिल्हा रुग्णालय आनंदग्राम संस्थेला मदत करतात

बीड । प्रतिनिधी

**जीवघेण्या आजाराची बाधा झाल्यानंतर नातेवाइकांनी अव्हेरले, जगण्याची आशाच संपली. अशा स्थितीत त्यांना इन्फंट इंडिया म्हणजेच आनंदग्राम प्रकल्पाने आधार दिला. शिक्षण दिले. आरोग्य सुविधा देताना त्यांचा विवाह लावून देत नवे आयुष्यही दिले. इतकेच नाही तर एचआयव्हीसह जगणाऱ्या या जोडप्यांचे मुले व्हायरसमुक्त जन्माला यावीत यासाठी त्यांना वैद्यकीय सुविधा दिल्या. नुकताच आनंदग्रामच्या ३० व्या व्हायरसमुक्त बाळाने जन्म घेतला.**

बीड तालुक्यातील पाली येथे इन्फंट इंडिया म्हणजेच आनंदग्राम संस्था सुमारे दोन दशकांपासून एचआयव्हीबाधित मुलांसाठी काम करत आहे. दत्ता व संध्या बारगजे या दांपत्याने या संस्थेच्या माध्यमातून बीडची वेगळी ओळख देशभर निर्माण केली आहे. आजघडीला सुमारे ७० मुले या संस्थेत आहेत. मुलांचे पालनपोषण, उपचार हे सर्व संस्था करत आहे. आता या कामात डॉ. पृथ्वीराज आणि डॉ. जागृती ही बारगजेंची दुसरी पिढीही जोडली गेली आहे.

आनंदग्राममध्ये एचआयव्हीसह जगणाऱ्या बालकांची काळजी घेतानाच त्यांचा एचआयव्ही बाधित जोडीदाराशी विवाहही लावून दिला जातो. मागील काही वर्षांपासून तर एचआयव्ही बाधितांच्या सामुदायिक विवाह सोहळ्याचेही आयोजन केले जाते. यात आनंदग्राममधील मुलींचाही समावेश असतो. आतापर्यंत ५८ जणांचे अशा प्रकारे विवाह लावून दिले आहेत.

एचआयव्हीसह जगणाऱ्या दांपत्याला मूलही एचआयव्ही बाधित होत असते, मात्र गर्भधारणा झाल्यानंतर वेळीच उपचार केले गेले, तर हे मूल व्हायरसमुक्त जन्मते. त्यामुळे आनंदग्रामकडून आपल्या लेकींची बाळंतपणातही काळजी घेतली जाते. त्यांचे बाळंतपण केले जाते. नुकतेच आनंदग्राममध्ये व्हायरसमुक्त बाळ जन्मले हे ३० वे व्हायरसमुक्त बाळ आहे.

एचआयव्हीबाधित दांपत्याला मूल झाल्यानंतर ते निगेटिव्ह जन्मले तरी त्याच्यावर एक वर्ष उपचार केले जातात. वर्षभरानंतर पुन्हा या बालकाची एचआयव्ही चाचणी केली जाते. महाराष्ट्र एड्स नियंत्रण सोसायटी, बीड जिल्हा रुग्णालय हे यासाठी आनंदग्रामला मदत करतात.

## गृह राज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरी गेलाच नाही

# विरोधकांनी अफवा पसरवणे बंद करावे : अनिलदादा जगताप

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा दौऱ्यावर असताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरी गेल्याच्या बातम्या शनिवारी दिवसभर सर्व टीव्ही चॅनलवर, पोर्टलवर सुरु होत्या. मंत्र्यांच्या मोबाईल चोरीच्या बातमीने राज्यभर खळबळ उडवून दिली. मंत्र्यांचाच मोबाईल सुरक्षित नाही तिथे सर्वसामान्यांचे काय? असा प्रश्न देखील नेत्यांमधून उपस्थित होऊ लागला होता. या सर्व प्रकारानंतर शनिवारी रात्री उशिरा बीड पोलीस अधीक्षकांनी मोबाईल फोन विसरला होता नंतर तो कोणीतरी आणून दिला असे स्पष्टीकरणही दिले आहे. मात्र विरोधक आऊचा बाऊ करून सोशल मीडियावर अफवांचे वावडळ आणत आहेत.

याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी पत्रक काढून सविस्तर माहिती दिली आहे की, विविध समाज माध्यमांवर व विविध न्यूज पोर्टलवर मा. योगेश कदम, राज्यमंत्री (गृह) महाराष्ट्र राज्य हे मस्साजोग ता. केज येथे आलेले असतांना त्यांचा मोबाईल गहाळ/चोरी गेल्याची बातमी प्रसारित झाली. परंतु सदर बाबत सत्यता अशी आहे की, मा. मंत्री महोदय हे मस्साजोग येथे धनंजय



देशमुख व कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी धनंजय देशमुख यांच्या शेजारी बसलेले होते. पत्रकारांशी संवाद साधताना मोबाईल खाली ठेवला होता त्यानंतर ते बांधकाम सुरू असलेले घराची पाहणी करण्यासाठी चालत गेले.

घराची पाहणी करत असताना त्यांनी पीएंकडे मोबाईल मागीतला त्यावेळी पीएंनी माझ्याकडे मोबाईल नाही असे सांगीतले. त्यावेळी मंत्री महोदय यांनी मोबाईल शोधा असे म्हटले. हे वाक्य उपस्थित लोकांपैकी कुणीतरी ऐकून बाहेर वाच्यता केली. परंतु मंत्री महोदय व मी स्वतः जाण्यासाठी गाडीत बसलो असता कोणीतरी मोबाईल आणून माझ्याकडे दिला व तो मोबाईल मी स्वतः मंत्री महोदय योगेश कदम यांच्याकडे दिला. मंत्री महोदयांना त्यांचा मोबाईल मिळाला आहे, हे बाहेर माहीत नसल्यामुळे या अफवा जाणीवपूर्वक पसरवल्या चालल्या आहेत. मंत्री महोदय यांचा मोबाईल चोरी झालेला नाही. कृपया कोणीही अफवांवर विश्वास ठेऊ नये. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब हे देशमुख कुटुंबीयांना मदतीचा एक हात म्हणून स्वतःच्या हक्काचे घर बांधून देत आहेत. देशमुख कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी तसेच त्यांना बांधून देत असलेल्या घराच्या बांधकामाची पाहणी करण्यासाठी वारंवार शिवसेनेचे विविध नेते, मंत्री मस्साजोग येथे येऊन भेट देत आहेत. घडलेली घटना अत्यंत साधारण होती. मात्र विरोधकांनी गृह राज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरीला गेल्याच्या अफवांचे वावडळ आणले असून सोशल मीडियावर बीडची बदनामी करणे सुरु केले आहे. विरोधकांनी अफवा पसरवने बंद करावे आणि बीडची बदनामी थांबवावी असे आवाहन शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी प्रसार माध्यमांमध्ये पत्रक जाहीर करून केले आहे.

# महावितरणचा गलथान कारभार खपवून घेतला जाणार नाही : सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात गुरुवारी (दि.५) रात्रभर वीज पुरवठा खंडित होता. यामुळे नागरिकांना ऐन उन्हाळयात उष्णतेचा सामना करावा लागला. महावितरणच्या गलथान कारभाराचा फटका नागरिकांना बसला असून गुरुवारी रात्रभर जागरण करण्याची वेळ नागरिकांवर आली. यापुढे महावितरण गलथान कारभार खपवून घेतला जाणार नाही. अधिकाऱ्यांना शिवसेना स्टाईल उत्तर देऊ तसेच वरिष्ठांकडे तक्रार करु असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून बीड शहरात ढगाळ वातावरण आहे.



शहरात गुरुवारी रात्री किरकोळ प्रमाणात पाऊस झाला. कसलेही वादळ नव्हते. अगदी रस्ते ओले होतील एवढाच पाऊसही झाला. मात्र जोराचा पाऊस झाला आणि झाडे पडल्याचे कारण सांगून महावितरणने संपूर्ण बीड शहराचा वीजपुरवठा खंडित केला. अगोदरच उन्हाच्या तीव्रतेने नागरिक त्रस्त आहेत. त्यात अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना रात्रभर उष्णतेचा सामना करावा लागला. वीज पुरवठा सुरु होण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना विचारणा केली असता अधिकारी कर्मचारी फोन घेत नव्हते. नंतर त्यांनी फोन बंद ठेवल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे संपूर्ण शहरातील नागरिकांना गुरुवारची रात्र जागून काढावी लागली. उन्हाळ्यात वीजेची मागणी वाढते तसेच हवामान खात्याने पावसाचा अंदाज वर्तवल्यानंतर शहरातील प्रत्येक डीपी व इतर ठिकाणी यंत्रांची तपासणी करावी तसेच महावितरणने कारभार सुधारावा. नसता शिवसेनेच्या पद्धतीने उत्तर देऊ असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिला आहे.

# ३० हजार द्या घरकूल न बांधता हप्ते काढून घ्या इंजिनियर जायभायेची योजना

## ■ बीडीओ मुळूक यांना ३० हजारातील किती टक्के जातात?
## ■ घरकुल न बाधता हप्ते केले वर्ग जायभाये वर कारवाई कधी होणार?

माजलगाव । प्रतिनिधी

शासनाने गोरगरिबांना हक्काचे घर मिळावे कोणीही घरापासून वंचित राहू नये यासाठी अनेक घरकुल योजना लागू केल्या पण या योजनांमध्ये लाभार्थींची कोंडी करून इंजिनीयर व अधिकारी यांच्याकडून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार होताना दिसत आहे. माजलगाव पंचायत समिती येथे कार्यरत असणारे इंजिनिअर जायभाये यांनी आनोखी योजना चालू केलेली आहे तीस हजार रुपये द्या घर न बांधता हप्ते काढून देतो अशाप्रकारे खुलेआम भ्रष्टाचार केला जातोय जनतेची लूट करून शासनाची फसवणूक केली जातेय तरीही बीडीओ हे मूग गिळून गप्प आहेत. शासन नियमानुसार घरकुलाचे हप्ते टप्प्या टप्प्या ने जेवढं बांधकाम होईल तेवढा पाहणी अहवाल इंजिनिअर द्वारे सादर करून हप्ते वर्ग करावेत पण घर न बांधता किंवा जुन्या घरावर पूर्ण हप्ते वर्ग करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी जायभाये यांच्यावर कारवाई का होत नाही? यांच्याकडून मुळूक मॅडम यांना तीस हजारातील किती टक्के कमिशन जाते असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.





इंजिनिअर जायभाये हे घरकुल लाभार्थ्याकडून हप्ते टाकण्यासाठी पैशाची मागणी करतात व घर न बांधता घरकुलांचे हप्ते टाकण्यासाठी तीस हजार रुपयाची सेटलमेंट करतात. पीएम व विविध आवास योजनेमधून घरकुल आलेले आहेत यामध्ये घरकुल लाभार्थ्याकडून पाहणी अहवाल करताना प्रत्येक वेळी पैशाची मागणी केली जाते व पैसे दिले नाही तर हप्ते टाकत नाही अशी मुजोरीची व आरेरावीची भाषा इंजिनियर जायभाये व ग्राम रोजगार सेवक यांच्याकडून करण्यात येते. साहेब दीड लाखात घर बांधता येते का आणि त्यात तुम्ही पैसे मागतात असे लाभार्थ्यांनी सांगितल्यावर जायभाये चे उत्तर असते की मग घर बांधू नका ना तीस हजार द्या सगळे हफ्ते काढून देतो तुमचीही बेजारी नको आणि माझी ही नको. घर बांधूनही प्रत्येक पाहणी च्या वेळी पैसे द्यावेच लागतात अशाप्रकारे लाभार्थींची कोंडी करून सर्रासपणे पैसे घेऊन लाभार्थ्यांकडून आर्थिक लूट केली जाते. त्यामुळे इंजिनीयर जायभाये व संबंधित अधिकारी यांच्यावर तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा पंचायत समिती कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा घरकुल लाभार्थ्यांनी दिलेला आहे.

घरकुल लाभार्थ्यांची पिळवणूक करून हे त्यांच्याकडून आर्थिक वसुली करत आहेत. या भ्रष्ट अधिकाऱ्यांना शासनाचा धाक उरलेला नाही का? कारण या भ्रष्टाचारामध्ये बी डी ओ व पंचायत समितीचे अधिकारी पण सामील आहेत असा आरोप नागरिकांमधून होत आहे. भ्रष्टाचाराने बरबटलेल्या माजलगाव पंचायत समिती कार्यालयाचे इंजिनीयर यांच्यावर बीडिओ मुळूक मॅडम कारवाई कधी होणार असा सवाल सामान्य नागरिक व लाभार्थी करत आहेत.

# महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना नेकनूर शहर अध्यक्षपदी शेख शाकेर यांची निवड

बीड । प्रतिनिधी



दिनांक ६ एप्रिल २०२५ रविवार रोजी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांच्या मार्गदर्शना खाली बीड जिल्हा अध्यक्ष शेख नासिर यांच्या उपस्थित बैठक संपन्न झाली या बैठकीत नेकनूर शहर अध्यक्ष एकमताने शेख शाकेर यांची निवड करण्यात आली.

या बाबत सविस्तर महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाच्या वतीने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई च्या वतीने बांधकाम कामगारांच्या सर्वांगीण कल्याणाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी व कामगारपर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहचवण्याचे काम महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना करत राहत आहे या सदर्भात नेकनूर परिसरातील कामगार यांचे प्रश्न सोडवण्या करिता बीड जिल्हा महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना शाखा नेकनूर येथे महत्व पूर्ण बैठक संपन्न झाली. यावेळी उपस्थित सचिन शिंदे (उपसरपंच नेकनूर), माजी सरपंच राजा भैय्या शिवा शिंदे ग्रामपंचायत सदस्य रहीम साहब ग्रामपंचायत सदस्य बबलू सय्यद ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत शिंदे समाजसेवक मतीन खतीब युवा नेता व समाजसेवक शेख जफर पाशा समाजसेवक समाजसेवक पठाण फाईम खान, सय्यद जुल्फे खार अली पत्रकार शेख शाहेबाज भैय्या सलील. मिर्झा राशीद बॅग शिरू दादा, सलमान भैय्या नेते शपथ शेख, दत्ता सावंत, राहुल शिंदे, जय किसान विजय शिंदे, श्रीराम आप्पा घोडके, जगन्नाथ घोडके, घोडके सर, शकील कारबारी शेख साजिद भाई व इतर मान्यवर संह ग्रामस्थ उपस्थित होते.

# केज शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण



केज । प्रतिनिधी

केज शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये भारतरत्न, सविंधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण रविवारी दिनांक ०६ एप्रिल २०२५ रोजी रात्री जनविकास परिवर्तन आघाडीचे नेते मा. हारून भाई ईनामदार तसेच केज नगर पंचायत च्या लोकप्रिय नगराध्यक्षा सिता ताई बनसोड यांच्या उपस्थित संपन्न झाले. या प्रसंगी केज शहरातील सर्व बहुजन युवा, कार्येकर्ते, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

# प.पु.वासुदेवराव खंदारे गुरुजी यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त समाधान महाराज शर्मा यांचे किर्तन

केज । प्रतिनिधी



ठाकूर रामकृष्ण परमहंस परिवाराचे आधारवड परम पूज्य कै. वासुदेवराव खंदारे गुरुजी यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त भावरत्न ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांचे किर्तन संपन्न झाले. यावेळी त्यांनी अमर आहां अमर आहां ।खरें कीं पाहा खोटें हें पहा।। न म्हणां देह माझा ऐसा।मग भरवसा कळेल।। कैंचा धाक कैंचा धाक। सकिळक हें आपुलें।। देवचि बरे देवचि बरे । तुका म्हणे खरे तुम्ही ।। या अभंगा वर निरुपण केले. प.पु. वासुदेवराव खंदारे गुरुजी यांनी आपल्या आयुष्यात अनेक व्यक्ती घडविण्यासाठी आपले आयुष्य वेचले.

सर्व सामान्य माणसापासून ते उच्च शिक्षीत व्यक्ती यांना घडवून सर्वांना माणूस म्हणून जगण्याचा मंत्र दिला. आता प्रत्येक क्षेत्रात गुरुजींचा परिवाराने आपला वेगळा ठसा उमटवला आहे. गुरुजींचा हा वसा पुढे चालविण्यासाठी सर्वांनी प्रतिज्ञा करून प्रयत्न करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी साधु नागेश पुरी मठ संस्थान वरपगावचे मठाधिपती ह.भ.प. महंत भगवान महाराज शास्त्री यांनी आशिर्वादपर मार्गदर्शन केले. या प्रसंगी ठाकूर रामकृष्ण परमहंस परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामजी की निकली सवारी, रामजी की लिला है न्यारी

## श्रीराम जन्मोत्सवानिमित्त मिरवणुक उत्साहात; हजारो रामभक्त युवकांचा सहभाग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात रामजन्मोत्सव निमित्त्याने भव्य मिरवणुक मोठ्या उत्साहात काढण्यात आली मिरवणुकीत हजारो रामभक्त युवकांचा सहभाग होता या निमित्ताने शहरात भगवे ध्वज,पताका, विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

रामभक्तांच्या वतीने शहरातून भव्य मिरवणुक काढण्यात आली पाटील चौक भागातील राममंदीर येथून या मिरवणुकीस प्रारंभ होऊन शहरातील विविध महत्वपुर्ण चौक,मुख्य रस्ते आदी ठिकाणाहून या मिरवणूकीने मार्गक्रमण केले. यावेळी भव्य अशा श्रीरामांच्या भव्य आकर्षक मुर्तीचे भक्तांनी दर्शन घेतले. या मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**मिरवणुकीने शहरातील वातावरण भक्तीमय**

अंबाजोगाईत राम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त पारंपारीक राम मंदिरात जन्मोत्सव तसेच पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला. या निमित्त्याने शहराच्या धार्मिक वैभवात भर पडली तसेच वातावरण भक्तीमय झाले विशेष म्हणजे शहरातून निघालेली भव्य मिरवणूक शहराचे प्रमुख आकर्षण होती, प्रभु रामचंद्रांच्या मुर्तीचे विधिवत पुजन करून या मिरवणूक सोहळ्याला प्रारंभ झाला. गेल्या काही वर्षापासुन होत असलेल्या या मिरवणूकीने अंबाजोगाईच्या धार्मिक तसेच सांस्कृतिक वैभवात भर घातली. शहराला धार्मिक वारसा असून मिरवणूकीच्या निमित्ताने यात अधिक भर घातली गेली आहे.

**भगवे ध्वज ठरले आकर्षण**

कोरोना संकटामुळे युवकांना सर्व सण, उत्सव साजरे करता आले नाहीत संकट नाहिसे झाल्यानंतर श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले असता यात हजारो युवक भगवे ध्वज घेवून मिरवणूकीत समुहाने सामील झाले होते.हे युवक अधिक आकर्षण ठरले. विविध रामगीतांच्या गाण्यावर अभिनय आणि नृत्य करून आपल्या हातातील ध्वज हवेत उंचवून नागरिकांचे लक्ष वेधत होते. मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणच्या रस्त्यावर रांगोळ्या काढून भगव्या पताका, ध्वज, फलक, लावुन मिरवणुकीचे शहरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

# अशी ही एक रमजान ईद...!!

**धर्म कभी खराब नही होता इंसान ही खराब होता है और जो इंसान खराब होता है उसका कोई धर्म नही होता. भारत देश हा विविध धर्मांचा देश आहे. या भारत देशात विविध धर्माचे लोक आनंदाने गुण्यागोविंदाने राहतात. सगळ्या धर्माचे मूळ हे मानवता हेच आहे. धर्माचे रीती रिवाज भजन पूजन चालीरीती जरी वेगवेगळ्या असल्या तरी धर्माचा मूळ हेतू मानवता निर्माण करणे हाच आहे. त्यामुळे धर्म कधीच वाईट नसतो धर्मातील व्यक्ती एखादी चांगली किंवा चुकीचे असू शकते परंतु धर्म वाईट म्हणणे हे चुकीचे ठरेल. व्यक्तीच्या धर्मानुरूप वागणुकीवर त्या व्यक्तीच्या धर्माचं अवलोकन करता येऊ शकत किंवा तो व्यक्ती त्या धर्माला किती न्याय देऊ शकतो हे लक्षात येतात.**



कोणताही एक धर्म दुसऱ्या धर्माला कमी लेखण्याची परवानगी देत नाही पण काही विकृत लोकांमुळे चुकीच्या गोष्टी आपल्याला पहावयास मिळतात. वेगवेगळ्या धर्माचे वाईट लोक असतात तसे चांगलेही लोक असतात. गरज आहे आपण त्यांची जाणीव करण्याची. काल आमच्या क्लासेस मध्ये आमचा आठवी सीबीएससी चा विद्यार्थी अन्सारी चे पालक आले. अन्सारी हा खूप हुशार मुलगा. त्याच्या बोलण्यात वागण्यातून संस्कार निदर्शनास येतात. तबरेझ आणि रोहिता हे अन्सारीचे आई-वडील इमारतीच्या तिसऱ्या चौथ्या मजल्यावर हे दाम्पत्य चालत आले. तेव्हा त्यांना थोडी धाप लागली होती. ते आले तेव्हा माझ्या लक्षात आलं की ते काही अपेक्षा काही सूचना करावयास आले असतील. नियमाप्रमाणे मी त्यांना बसावयास विनंती केली पाणी वगैरे दिले त्यांना धाप लागल्यामुळे थोडं शांत होऊ दिले. मला काही सूचना किंवा अपेक्षा व्यक्त करतील याच जाणविणे मी चर्चेस सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी जे व्यक्त झाले त्याबद्दल मला आश्चर्य वाटले. तबरेज भाई,त्यांच्या पत्नी रोहिता, त्यांची मुलगी सारा, आणि त्यांचा मुलगा म्हणजे आमचा विद्यार्थी अन्सारी व आमचे सहकारी हाटोटे मामा आम्ही सगळे एकत्र होतो. तबरेज भाई म्हणाले सर आम्हाला तुमच्याकडून काहीही अपेक्षा नाही परंतु एक विनंती आहे. आपल्या क्लासेसच्या सर्व स्टाफ माझ्या घरी रमजान ईदच्या निमित्ताने शीरखुर्मासाठी आपण सर्वजण यावे आपल्या सर्वांची वेळ मिळावी यासाठी मी आपली वेळ घेण्यासाठी आलेलो आहे. मला आश्चर्य वाटलं की हे दांपत्य आवर्जून सर्व शिक्षकांना निमंत्रित करण्यासाठी सहपरिवार या ठिकाणी आले आहे आणि विनंती करून वेळ मागताहेत की आमच्या घरी पाहुणचारासाठी या. मला एका क्षणासाठी काय व्यक्त व्हावं हेच कळेना. एक अनोळखी कुटुंब बिल्डिंगच्या जिना चढून धाप टाकत या ठिकाणी आले आणि विनंती करत आहे की तुम्ही आमच्या इथे या विशेष म्हणजे सर्व स्टाफला घेऊन या ,मला खूप छान वाटले. मी त्यांना म्हणालो की आमच्या संचालक सरांना मी विचारतो त्यांची जी वेळ अनुकूल असेल तुम्हाला कळवतो आणि आम्ही नक्कीच येऊ असे सांगीतले त्यांनी पण त्याला सकारात्मक प्रतिसाद देऊन धन्यवाद म्हटले. माझ्या मनात विचार आला की काय गरज होती त्यांना आम्हाला आमंत्रित करायची. पण नाही त्यांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून आपल्याला बोलावले होते. परस्परातील अंतरिक संबंध दृढ प्रेम सद्भाव वाढीस लागावा. या शुद्ध हेतूने त्यांनी आम्हाला आमंत्रित केले होते. त्यांनी या म्हटल्यानंतर त्यांनी जे शब्दरूपी आमंत्रण मला दिले त्या शब्दातून मला उतराई व्हावेसे वाटले. मी त्यांना ऑफिसमध्ये थोडे थांबावयास सांगितले. माझे सहकारी श्री अनमोल सर, श्री.हटोटे मामा, श्री.शिंगणे सर यांना सोबत घेऊन मी त्यांचा छोटा सत्कार केला. त्यांनी याची काही आवश्यकता नाही असे विनयपूर्वक सांगितले. परंतु मला ते योग्य वाटेना मी त्यांना विनंती केली की आमचा छोटा सत्कार आपण स्वीकार करावा. त्यानंतर आम्ही तबरेज भाई त्यांच्या पत्नी रोहिता सारा, अन्सारी या दोन्ही मुलासहित त्यांचा सत्कार केला. मला सत्कार करताना खूप छान वाटले. एका चांगल्या व्यक्तीला आपण सन्मानित करत आहोत असे जाणवले. त्यांनी नैतिकता मानवता म्हणून आम्हाला आमंत्रित केले. आम्ही त्यांचा यथायोग्य सत्कार केला. हा सत्कार फक्त शिक्षक-पालकाचा नव्हता. हिंदू - मुसलमान यांचाही नव्हता.हा सत्कार मानवतेचा होता. समाजात असणाऱ्या धर्मांध लोकांना ती एक चपराक होती आणि आपापल्या धर्माप्रमाणे वागून इतरांच्याही धर्माचा आदर करणाऱ्यांना प्रेरणा देणारा हा सत्कार होता. सर्वधर्मसहिष्णुताचा पुरस्कार करणारा हा सत्कार होता. हा सत्कार होता परस्परांतील प्रेम भावना वाढीस लावणारा. या सत्काराच्या वेळी सर्वांच्या चेहऱ्यावर एक प्रेम, आदर, समाधान, सन्मान, आनंद होता. मला वाटतं कोणत्याही धर्माला हेच अपेक्षित असावं. श्री.अनमोल सरांच्या पाठीमागे छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना देखील हेच अभिप्रेत असावं आणि त्यांना देखील असा सन्मान होतोय याचा आनंद वाटला असेल. शिवाजी महाराजांच्या अपेक्षेनुरूप एक छोटसं पाऊल टाकल्याचा आनंद व समाधान मला जाणवले. आम्ही सगळे नक्कीच आपल्याकडे ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी येऊत असे त्यांना सांगितले व त्यांना आदरपूर्वक निरोप दिला.

**धन्यवाद...!!**



श्री.गलांडे सर
निवेदक, गेवराई

# घरकुलांचे बांधकाम रखडले वाळु घाटांचा लिलाव सुरू करा

## घरकुल धारकांना मोफत ५ ब्रास वाळूचा शासन आदेश पारीत करा; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

सर्वांसाठी घर हे केंद्र शासनाचे धोरण असुन त्यानुसार बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळावे या हेतूने केंद्र व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येतात. पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना अहिल्यादेवी आवास योजना सह इतर योजनातून बीड जिल्ह्यात जवळपास ७६६६५ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.मात्र वाळु अभावी घरकुलांची बांधकामे रखडली असल्याचे सर्वत्र चित्र दिसुन येत आहे. मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांनी घोषणा केल्याप्रमाणे घरकुल धारकांना मोफत ५ ब्रास वाळु देण्याचे शासन आदेश काढण्यात यावेत, राज्य शासनाच्या वाढीव ५० हजार रूपयांच्या अनुदानातुन १५ हजार सोलरवर खर्च करण्याची अट रद्द करण्यात यावी. बीड जिल्ह्यात वाळु घाटांचे स्थगित लिलाव सुरू करण्यात यावेत. जवळपास ४०- ५० हजारांना ५-६ ब्रास वाळू मिळते. वाढत्या महागाईत गोरगरीब घरकुल धारकांना ती परवडत नाही त्यामुळे वरील मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०७ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री , महसूलमंत्री, विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड, शेख युनुस, शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख, पांडुरंग हराळे, जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले आदी सहभागी होते.




केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाभियान योजना राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांकरीता रमाई आवास योजना, अनुसूचित जमाती करीता शबरी आवास योजना व आदिम आवास योजना तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती करीता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व ईतर मागास वर्ग प्रवर्गासाठी मोदी आवास योजना, अहिल्यादेवी आवास योजनांसह घरकुलांच्या ईतर योजनातुन जवळपास ७६ हजारांच्या पुढे घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. मात्र प्रशासनाचे वाळु टेंडर झालेले नाही. जी वाळु बांधकाम कामगारांना घ्यावी लागते ती जवळजवळ ४० ते ५० हजारांना ५-६ ब्रास वाळू मिळते. एवढ्या मोठ्या रकमेची महागडी वाळु घेऊन घरकुलाचे बांधकाम करणे शक्य नसल्याने केवळ आणि केवळ वाळुमुळे घरकुलाचे बांधकाम रखडलेले आहेत. मध्यंतरी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घरकुल धारकांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा केली. मात्र त्याचा शासन आदेश न आल्याने घरकुल धारकांना वाळु मिळत नाही. त्यामुळे शासन आदेश पारीत करण्यात यावेत.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ (सन २०२५ ते सन २०२८-२९) अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्यातुन ५०,००० ईतकी अतिरिक्त वाढ करण्यात आली आहे. मात्र यापैकी ३५ हजार रूपये बांधकामासाठी आणि १५ हजार रुपये सरकार प्रधानमंत्री सुर्यघर योजनेंतर्गत सौर ऊर्जा यंत्रणेसाठी खर्च करणार असुन जे ही यंत्रणा उभी करणार नाहीत त्यांना १५ हजार मिळणार नाहीत. हि जाचक अट रद्दबातल करण्यात यावी.

**बीड जिल्ह्यातील वाळुघाटांचे स्थगित लिलाव सुरू करावेत**

सध्या बीड जिल्ह्यात एकही वाळूघाट सुरू नाही. दोन महिन्यांनंतर पावसाळ्याला सुरूवात होणार आहे. बीड जिल्ह्यात वाळू घाटांचे लिलाव स्थगित करण्यात आले आहेत. शेजारच्या जिल्ह्यामध्ये मात्र वाळूघाट सुरू आहे. परिणामी बीड जिल्ह्यात गोरगरिबांना वाळू मिळणे अवघड झाले असून त्यांचा बांधकामाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे जिल्ह्यात तातड्याने वाळु घाटांचे स्थगित लिलाव सुरू करण्यात यावेत.

# अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसवा

## नसता राज्यकर्त्यांना दलित वस्तीत येऊ देणार नाहीत : अशोक ढगे

माजलगाव । प्रतिनिधी




दिनांक ७ मार्च २०२५ रोजी माजलगाव तहसीलदार यांना आझाद क्रांती सेनेच्यावतीने निवेदन देण्यात आले. अण्णाभाऊ साठे यांचे महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये मोलाचे योगदान असून इथल्या शोषित उपेक्षित वंचितांचे दुखणं आपल्या धारदार लेखणीच्या माध्यमातून जगांच्या समोर आणण्याचं काम ज्या महानायकाने केलं त्या महानायकाचा पुतळा माजलगाव शहरातील विश्रामगृह येथे भव्य उभारण्यात यावा असे निवेदन आझाद क्रांती क्रांती सेनेचे तालुकाप्रमुख अशोक ढगे व आझाद क्रांतीसेना माजलगाव तालुका कार्यकारणी च्या वतीने माजलगाव तहसीलदार यांना देण्यात आले.

सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या वरती प्रेम करणाऱ्या समाजाने या पुतळ्याची मागणी केलेली आहे. त्यामुळे सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यात यावा नसता प्रस्थापित राजकर्त्यांना आम्ही दलित वस्तीमध्ये येऊ देणार नाहीत असे आझाद क्रांती सेनेचे तालुकाप्रमुख अशोक ढगे यांनी म्हटले आहे.

याप्रसंगी तालुका प्रमुख अशोक ढगे, ज्येष्ठ नेते किसन भिसे सर, कैलास गायकवाड, गौपाळ गवळी, शिवाजी कवडे, संदिप भिसे, मल्हारी ढगे, धमानंद भालेकर, असलम पठाण, राहूल क्षिरसागर, बाळू उपाडे, वैभव चांदणे, राहूल गायकवाड, बाबूराव गायकवाड, सूरेश घोडे, उमेश भिसे, सूरवसे कृष्णा कैलास, कैलास शिंदे, कूरेशी कालू, अनिल हिवाळे, करण गायकवाड, गौतम वारे, गणेश कोल्हे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# किल्ले धारूर येथे श्री हनुमान जयंती निमित्त भव्य कीर्तन महोत्सव

धारूर । प्रतिनिधी

प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षी देखील जय हनुमान मित्र मंडळ किल्ले धारूर च्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्ताने भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचा लाभ हजारो हनुमान भक्तांना होणार आहे. यांचं लाभ घेण्याचे आवाहन जय हनूमान मित्र मंडळाचे वतीने करण्यात आले आहे.

महोत्सवात ८ एप्रिल रोजी ह भ प गणेश महाराज पाठक, ९ एप्रिल बाबा महाराज शेख १० एप्रिल गीता ताई महाराज नागरगोजे ११ एप्रिल भागवताचार्य किशोर महाराज नानवटे यांची सुश्राव्य कीर्तने आयोजित करण्यात आली असून १२ एप्रिल रोजी ह भ प भागवताचार्य ओंकार महाराज ढाणे आळंदीकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. यावेळी मृदंगाचार्य श्री रामभाऊ महाराज साखरे व महारुद्र महाराज शिंदे तर गायनाचार्य म्हणून हनुमंत मैंद यांची साथ लाभणार आहे. श्रीदत्त संस्थान भजनी मंडळ तांदळवाडी व जय हनुमान भजनी मंडळ किल्ले धारूर यांचा हरिपाठ व जागर देखील या महोत्सवात होणार आहे. सर्व भाविकांनी कीर्तन महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आव्हान जे हनुमान मित्र मंडळ किल्ले धारूर च्या वतीने करण्यात आले आहे.

# व्हॉइस ऑफ मीडिया धारूर तालुका कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी अतुल शिनगारे तर सचिवपदी अविनाश जगताप यांची सर्वानुमते निवड

धारूर । प्रतिनिधी

राज्यभरात पत्रकारांच्या अनेक संघटना अस्तित्वात आहेत. यामध्ये तीन वर्षापासून सदस्य नोंदणी सर्वोच्च आहे. व्हॉईस ऑफ मीडियाच्या माध्यमातून अनेक प्रश्न सोडवण्यासाठी पत्रकार बांधव सातत्याने प्रयत्नशील आहेत. राज्यभरात नवीन कार्यकारणी मागील पंधरा दिवसापासून निवडली जात आहेत. याच अनुषंगाने धारूर कार्यकारणीची निवड संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, जिल्हाध्यक्ष जालिंदर धांडे, मा.जिल्हा बालाजी मारगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील हुतात्मा स्मारक येथे संपन्न झाली. यामध्ये अध्यक्षपदी सर्वानुमते अतुल शिनगारे, कार्याध्यक्ष ईश्वर खामकर, उपाध्यक्ष रवी गायसमुद्रे, बालाप्रसाद जाजू,



सचिव अविनाश जगताप, कोषाध्यक्ष सतीश पोद्दार प्रसिद्धीप्रमुख अतिक मोमीन यांच्या सह सदस्यांची निवड करण्यात आली.

महाराष्ट्रभरात मीडिया संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांचा संघटन दिवसेंदिवस मजबूत होत आहे. अनेक पत्रकार बांधव माझ्या नवीन सदस्य होऊन व्हाईस ऑफ मीडिया बळकट करण्यासाठी काम करत आहेत. याच अनुषंगाने धारूर स्मारक या ठिकाणी नवीन कार्यकारणीसाठी बैठक संपन्न झाली. यामध्ये सर्वानुमते अतुल शिनगारे, कार्याध्यक्ष ईश्वर खामकर, उपाध्यक्ष रवी गायसमुद्रे, बालाप्रसाद जाजू, सचिव अविनाश जगताप, कोषाध्यक्ष सतीश पोद्दार प्रसिद्धीप्रमुख अतिक मोमीन यांच्या सह सदस्यांची निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीस बैठकीचे अध्यक्ष प्रकाश काळे तसेच संदिपान तोंडे, सूर्यकांत जगताप, माजी अध्यक्ष सचिन थोरात यांच्या सह सर्वांनी नवनीयुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी नाथा ढगे, कैलास मुंडे, अविनाश ठोंबरे, सुनील तोंडे, यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.




# बहुचर्चेतील शॉर्ट फिल्म वनवा यामध्ये प्राचीने केली दमदार भुमिका

माजलगाव । प्रतिनिधी

अभिनयामध्ये करिअर करणं हे अनेकांचं स्वप्न असतं. तसे स्वप्न प्राचीने अगदी बालपणापासून पाहिले होते. योगायोगाने माजलगाव येथील पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी त्यांच्या शॉर्ट फिल्मसाठी ऑडिशन घेतले, तेव्हा त्यांना प्राची सारखी दमदार अभिनय करणारी अभिनेत्री भेटली, एकीकडे बाळासाहेब आडागळे यांना दमदार अभिनय करणारी अभिनेत्री मिळाली आणि दुसरीकडे अभिनय करण्यासाठी संधी मिळाल्याने प्राचीचे स्वप्न साकार होत असल्याने तिच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. एका गावंड्याची मुलगी अभिनय क्षेत्रात दमदार पदार्पण करीत असल्याचे पाहून सर्वसामान्य व्यक्तींना देखील याचा मनस्वी आनंद झाल्याचे पहावास मिळाले.

## मिस्त्रीची लेक अभिनयात नंबर एक

आकाशाला गवसणी घालण्याची इच्छाशक्ती असेल तर परिस्थिती आडवी येत नाही! क्षेत्र कोणतेही असो तुम्ही तुमच्या ध्येयाशी प्रामाणिक असाल तर घरची परिस्थिती कितीही हालाखीची असली आणि घरात अठरा विश्व दारिर्थ असले तरी तुमचे ध्येय साध्य करण्यापासून कोणीच रोखू शकत नाही. आकाशाला गवसणी घालायची प्रबळ इच्छाशक्ती तुमच्या मनात असेल तर तुम्हाला तुमची परिस्थिती आडवी येऊच शकत नाही.

आज मी हेच अनुभवत आहे, पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी मला त्यांच्या शॉर्ट फिल्ममध्ये संधी देऊन माज्या स्वप्नांना बळ दिले त्यामुळे मी त्यांची आभारी आहे अशी प्रतिक्रिया अभिनेत्री प्राची हिने व्यक्त केली.

**वडीलांसोबत प्राची**

गवंड्याची पोरगी अभिनय करतेय याचा मला अभिमान वाटतो !! माझ्या सगळ्या पिढ्या मोलमजुरी, कष्ट करून गुजरान करीत होत्या. आज मी देखील गवंडी म्हणून काम करतो. मला दोन मुली आहेत त्यापैकी प्राची अभिनय क्षेत्रात काम करते, तर मोठी मुलगी पुण्यात शिक्षण घेतेय याचा मला प्रचंड आनंद आणि अभिमान वाटतो. प्राचीनी निवडलेले क्षेत्र तिच्या स्वप्नांना बळ देणारे आहे. मी बाप म्हणून प्राचीसाठी कुठेही उभे रहायला तयार आहे, पण तिचे स्वप्न साकार व्हावे, हीच देवाचरणी प्रार्थना, अशी प्रतिक्रिया प्राचीचे वडील अनिल सोनवणे यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त दिली.

# रामराज्य येण्यासाठी राज शक्ती व धर्म शक्ती एकत्र यायला हवी : श्रीकृष्ण महाराज

केज । प्रतिनिधी

राज सत्ता व धर्म सत्ता एकत्र आल्यावर रामराज्य निर्माण होईल असे प्रतिपादन ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज चवार यांनी केज तालुक्यातील केकतसारणी येथे अखंड हरिनाम सप्ताहात रामनवमी निमित्त आयोजित पहीले किर्तनपुष्प सादर करताना त्यांनी व्यक्त केले.





झाले रामराज्य काय उणे आम्हासी! धरणी धरी पीक गाई वोळल्या म्हैसी !!
राम वेळोवेळा आम्ही गाउ ओवियें! दळीता कांडीता जेविता गे बाइये!!
स्वप्नीही दुःख कोणी न देखे डोळा ! नामाच्या गजरे भय सुटले कळीकाळा !!
तुका म्हणे रामे सुख दिले आपले ! तया गर्भवासी येणे जाणे खुंटले !!

हा अभंग त्यांनी किर्तन सेवा करण्यासाठी घेतला. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, राम राज्यातील जनता सुखी व आनंदी होती. सर्वत्र आनंदी आनंद होता. भगवान राम यांचे जीवन आदर्श आहे बंधु प्रेम कर्तव्य परायणता ही मुल्ये जपल्याने आदर्श समाज निर्माण होईल व समाज सुखी होईल. व एकत्र कुटुंब पद्धती चांगली होईल त्यामुळे नात्यात समन्वय राखून आनंदी रहावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी नागरिक, महिला तसेच भजनी मंडळी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रामनवमीनिमित्त नाहोली येथील अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

# श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याला उत्साहात सुरुवात

केज । प्रतिनिधी

महाराष्ट्राला संतांची भूमी समजली जाते. अन्य कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्रात सर्वाधिक महान संत होऊन गेले, त्यांच्या विचारांचा प्रसार हा भारताच्या सीमा ओलांडून झाला आणि सोबतच एक पावन भूमी म्हणून महाराष्ट्राचे नाव घेतले जाऊ लागले. एकीकडे शूरवीरांनी इतिहास घडवला तर अध्यात्मातून संतांनी समाज घडवला. महाराष्ट्रात संत साहित्य हा साहित्याचा एक वेगळा प्रकार घडला जातो यातूनच आपण महान संत परंपरेचा अंदाज लावू शकतो. महाराष्ट्राच्या भूमीत महान संतांनी जन्म घेतला असे संत तुकाराम, संत रामदास, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत नामदेव, संत मुक्ताई विसाव्या शतकातील महान विभूती संत भगवान बाबा, संत वामनभाऊ, संत ज्ञानेश्वर माऊली उत्तरेश्वर पिंपरीकर/चाकरवाडी. यांच्या कृपाशीर्वादाने व परंपरेने चालत आलेला व महंत ह भ प रामकृष्ण महाराज वरपगावकर, त्यागमूर्ती अर्जुन महाराज लाड गुरुजी, ह. भ. प. नारायण भाऊ महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, यांच्या अध्यक्षतेखाली अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, श्रीमद् भागवत कथा ज्ञानेज्ञ सोहळ्याला प्रारंभ झाला. त्याचप्रमाणे केज तालुक्यातील नाहोली गावामध्ये रामनवमीचे औचित्य साधून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते गणेश महाराज कोळसकर हिंगोली यांच्या कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, नाहोली तालुका केज येथे अविरत अखंड हरिनाम सप्ताह सोहळा चालू आहे. यावर्षी या सप्ताहाचा प्रारंभ दिनांक ०६ एप्रिल २०२५ रविवार व सांगता दिनांक १३ एप्रिल २०२५ रविवार या कालावधीमध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. दररोज ३५०० / लोकांची भोजनाची व्यवस्था व गावाला चुलबंद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये सकाळी नाष्टा, चहापान, दुपारी भोजन व सायंकाळी भोजन. दररोज सात दिवस पहाटे ४ ते ६ काकडा, ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण,१०ते ११ गाथा भजन, ११ ते ०२ भोजन व विश्रांती, २ ते ५ भागवत कथा, ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ६ ते ८ भोजन, व संध्याकाळी ९ ते ११ हरी किर्तन व नंतर ११ ते ०४ हरीजागर याप्रमाणे कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

किर्तन - रविवार ६ एप्रिल २०२५ ह. भ. प. उद्धव महाराज चोले खडकीकर. सोमवार ७ एप्रिल २०२५ श्री केशव महाराज घुले टाकळी. मंगळवार ८ एप्रिल २०२५ ह भ प श्री गणेश महाराज कोळसकर हिंगोली. बुधवार ९ एप्रिल २०२५ ह भ प माऊली महाराज भारती खडकवाडी कर. गुरुवार १० एप्रिल २०२५ श्री ह भ प छगन महाराज खडके. शुक्रवार ११ एप्रिल २०२५, श्री ह भ प डॉ. सुदाम महाराज पानेगावकर, विश्वशांती केंद्र आळंदी. शनिवार १२ एप्रिल २०२५ ह भ प श्री आप्पा महाराज चौरे चंद्रशेखर बाबा महाराज संस्थान चौंडी. यांची कीर्तने आयोजित केली आहेत. व रविवार दिनांक १३ एप्रिल २०२५ ह भ प श्री गुरुवर्य नारायण भाऊ महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन होईल व नंतर समस्त गावकरी मंडळी नाहोली यांच्या वतीने महाप्रसाद होणार आहे.

६ सकाळ व संध्याकाळचे अन्नदाते शिवाजी सदाशिव बिक्कड मुकादम, खंडू येडबा बिक्कड ग्रा.पं.सदस्य, शिवराज महादेव बावळे राजमा व्यापारी, सखाराम शिंदे, पांडुरंग धुमाळ, बंडू शिंदे, संभाजी शिंदे, रामदास शिंदे, गोरख मिरगणे, बाबुराव मिरगणे, प्रशांत गणपत देशमुख सर, दिलीप बाबुराव बिक्कड माजी सरपंच, धनराज सटवाजी बिक्कड कार्यकारी अभियंता पुणे, अशोक रामराव बिक्कड फौजी, रामेश्वर सुदाम बिक्कड उद्योजक पुणे, अंकुश विश्वनाथ बिक्कड मुकादम, सुभाष शिवाजी बिक्कड सर.

नाश्ता - नराज धर्मराज बिक्कड, उत्तम हरिभाऊ बिक्कड मुकादम, साहेबराव राजेंद्र बिक्कड पाटील, अमोल चंद्रशेन बिक्कड, पुरुषोत्तम माधवराव बिक्कड, पुरुषोत्तम निवृत्ती बिक्कड, दत्तात्रय बाबासाहेब बिक्कड, वैजनाथ कारभारी बिक्कड, रंजीत बिक्कड सरपंच, ज्ञानोबा धुमाळ उपसरपंच. महाप्रसाद - समस्त ग्रामस्थ मंडळ नाहोली. हरिजागर - माळेवाडी, धोतरा, मुंडेवाडी. एकुरका, सांगवी - सारणी नाहोली. पिंपळगाव, कोल्हेवाडी, अरणगाव, माळेवाडी. राजेगाव दैठना बहुला नाहोली. पिठी घाट, गदळेवाडी, शिरूर घाट, सारुळ. नांदूर, माळेवाडी, नाहोली. सावरगाव, तांबेवाडी,चौंडी, चाकरवाडी. मृदंगाचार्य - मृदंग विशारद सर्वश्री विष्णुपंत महाराज लोंढे, अविष्कार शिरसागर, सुमंत बंडू महाराज मेटे, हनुमंत देशमुख, महावीर बिक्कड, दादाराव बिक्कड, गणेश बिक्कड, सार्थक देशमुख, श्रीनिवास मिरगणे, गायनाचार्य - सर्वश्री ह भ प दीपक महाराज मेटे, भागवत दादा मुळे पिंप्री, गोवर्धन महाराज कोरडे, शंकर महाराज शिरूर, नारायण शिरसाट, जालिंदर मेटे, बलभीम बापू मेटे, अशोक भाऊ मेटे, रतन चौधरी, भीमराव मेटे, दिनेश मेटे, बाबासाहेब मेटे, श्रीमंत पाटील, किशोर महाराज येडे, ज्ञानेश्वर झेंडे व पंचक्रोशीतील सर्व भजनी मंडळ सात दिवस हजर राहतील.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर होणार कडक कारवाई; राज्य महिला आयोगाचे संकेत!

- रुग्णालयाच्या आडमुठ्या धोरणामुळे भाजप आमदार अमित गोरखे यांच्या पीएच्या पत्नीचा झाला होता मृत्यू
- रक्तस्राव होताना साडेपाच तास उपचार केला नसल्याचा ठपका?
- पेशंटला ऑपरेशन थिएटरमध्ये घेऊन जाण्याआधी दहा लाखाची केली होती मागणी
- धर्मदाय आयुक्तालयाची नियमावली पाळली गेली नाही

बीड | प्रतिनिधी

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर तनिषा भिसे यांच्या मृत्यूचे आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणाचा प्राथमिक अहवाल आरोग्य उपसंचालक यांच्या समोर पुणे पोलिस आयुक्तालयात सोमवारी सादर करण्यात आला. यावेळी राज्य महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर, पुणे पोलिस आयुक्त अमितेष कुमार उपस्थित होते. तसेच वरिष्ठ पोलिस अधिकारी याप्रसंगी उपस्थित होते. यानंतर रूपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेत घटनेची माहिती दिली आहे.

रूपाली चाकणकर पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाल्या, तब्बल साडेपाच तास रुग्णालयात असताना गर्भवती महिलेला मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत होता. असे होत असताना देखिल रुग्णालय प्रशासनाकडून कोणतेही उपचार करण्यात आले नाहीत. ९ वाजताची एन्ट्री असलेला पेशंट २.३० वाजता रुग्णालयातून बाहेर पडला. पेशंट साडेपाचतास रुग्णालयात असताना हॉस्पिटलमध्ये कोणतेही उपचार झाले नाहीत. तसेच यावर तुमच्याकडेच काही औषधी असतील तर तुम्हीच घ्या, असे रुग्णालयाकडून सांगण्यात आले होते. इतकेच नव्हे तर पेशंट समोरच १० लाखांची मागणी करण्यात आली. यामुळे पेशंट व भिसे कुटुंबीयांची मानसिक स्थिती खालावली होती. आधीच कुटुंबीयांची मानसिकता खचलेली असताना सूर्या रुग्णालयात भिसे कुटुंबीयांना पेशंटला घेऊन जावे लागले होते. तसेच धर्मदाय आयुक्तालयाची नियमावली पाळली गेली नाही. त्यामुळे रुग्णालयावर कारवाई होणार. आणखी दोन समितींचे अहवाल आल्यानंतर निश्चित कारवाई होणार आहे.






### कोणालाही सोडले जाणार नाही

रुग्णालयात धर्मदाय नाव असावे. तसेच आयोग जेव्हा कारवाई करत असते तेव्हा कोणत्या पक्षाचा आहे, ते पाहिले जात नाही. कोणी कोणत्याही पक्षाचा असला तरी चुकीचा असेल तर कारवाई होणार. सर्व दोषींवर कायदेशीर कारवाई करणार. या प्रकरणात कोणालाही सोडले जाणार नाही, असे आश्वासन रूपाली चाकणकर यांनी दिले.

पुढे बोलताना रुपाली चाकणकर म्हणाल्या, पेशंटला डॉक्टरांनी २ तारखेला बोलावले होते. पण हेवी ब्लिडिंग होत असल्याने पेशंट २८ तारखेला दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गेला. ९ वाजून १ मिनिटांची एन्ट्री दिसत आहे. पेशंटचा डॉक्टरांशी संपर्क झाल्यानंतर त्यांनी संबंधित स्टाफला सूचना दिली. डिलिव्हरीची ऑपरेशनची तयारी करा. पेशंटला ऑपरेशन थिएटरमध्ये घेऊन जाण्याआधी १० लाखाची मागणी करण्यात आली. त्यावर कुटुंबाने आता तीन लाख रुपये आहेत ते घ्या. पुढच्या दोन-चार तासात किंवा उद्यापर्यंत व्यवस्था करतो असे सांगितले. संबंधित रुग्णालयाला विविध विभागांकडून मंत्रालयातून फोन गेले. पण रुग्णालयाने कोणतीच दखल घेतली नाही.

कोणताही पेशंट चांगल्या उपचारांसाठी आपल्या आयुष्यातील व्यक्तीगत गोष्टी डॉक्टरांशी शेअर करतो. तनिषा यांची डॉ. घैसास यांच्याकडे ट्रीटमेंट सुरु होती. १५ मार्च रोजी पेशंट पहिल्यांदा डॉक्टरला भेटला. त्यावेळी याआधी ट्रीटमेंट कशी घेतली? सर्व मेडिकल हिस्ट्री सांगितली. पेशंटची मेडिकल हिस्ट्री डॉक्टरला माहित होती. ही घटना घडल्यानंतर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने एक समिती नेमली. त्या समितीने स्वत:ला वाचवण्यासाठी रुग्णाची व्यक्तीगत माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून मांडली. याचा मी निषेध करते, कुटुंबानेही यावर आक्षेप घेतला.

### धर्मदायी संस्थांनी चांगल्या पद्धतीची आरोग्य सुविधा देणे हे अपेक्षित

पुढे बोलताना रूपाली चाकणकर म्हणाल्या, खरेतर आरोग्य सुविधा हे अतिशय मूलभूत अशी गरज आहे. आणि नागरिकांना धर्मदायी संस्थांनी चांगल्या पद्धतीची आरोग्य सुविधा देणे हे अपेक्षित आहे. आणि तशी नियमावली असताना रुग्णाला हे उपचार देण्यासाठी त्यांनी टाळाटाळ केली. त्याच्यासाठी मागितलेली डिपॉझिटची रक्कम आणि एकंदरीत या सगळ्या घटनेमुळे यामध्ये रुग्णाचा मृत्यू झालाय. खरेतर प्रत्येक एक स्वप्न असते आणि एक मातृत्व मिळत असताना आपल्या मुलांसोबत आपले आयुष्य असावे. यामुळे आईचेच नाहीतर कुटुंबाचे स्वप्न भंग पावले.

### रुग्णालयाला मी कडक शब्दात समज देणार : रूपाली चाकणकर

आज मी या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांच्याकडून सविस्तर झालेला अनुभव हा खरंतर त्यांनी माझ्याकडे लेखी स्वरूपात दिलेला आहे. याच्यामध्ये बऱ्याच वेळा रुग्ण आणि डॉक्टर यांच्यामध्ये झालेल्या चर्चा, झालेले उपचार आणि जे काही रिपोर्ट हे गोपनीय असतात. पण यामध्ये हॉस्पिटलने स्वत:ला वाचवण्यासाठी जो अहवाल सादर केला आहे. आज रुग्णाच्या गोपनीय गोष्टी जाहीर केलेल्या आहेत ते अत्यंत चुकीचे आहे. आणि या घटना या गोष्टी हॉस्पिटलने खरंतर समितीसमोर मांडायला पाहिजे होते. ते सोशल मीडियाच्या माध्यमातून मांडले. रुग्णालयाला मी कडक शब्दात समज देणार आहे, असे चाकणकर म्हणाल्या.

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना आदर्श प्रशासकीय अधिकारी राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार जाहीर

बीड | प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बीड चे तहसीलदार चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके यांना आदर्श प्रशासकीय अधिकारी राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पैठण, गेवराई, बीड अशा अनेक ठिकाणी तहसीलदार म्हणून उत्कृष्ठ काम केले आहे. अनेक पत्रकार यानी बातम्या लावून त्यांच्या कामाचे कौतुक केले आहे. बीड मध्ये तहसील च्या कर्मचारी वेळेवर उपास्तीत राहून नागरिकांचे कामे वेळेत होतं असताना दिसत आहेत. श्रावण बाळ, संजय गांधी योजना चांगल्या पद्धतीने राबवून योग्य त्या व्यक्तींना लाभ देण्यात येतो. कधी नं होणारी मिटिंग दर महिन्याला होत आहे. अनेक लोकांना सुता सारखं सरळ करून योग्य ते काम बीड चे तहसीलदार शेळके सर करत आहेत. सर्वत्र त्यांचे कौतुक होतं आहे. या सर्व त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दाखल घेऊन लोकशाही पत्रकार संघाना चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके यांना आदर्श प्रशासकीय सेवा लोकरत्न पुरस्कार ने सन्मानित करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार सोहळ्यास राजस्थानचे राज्यपाल महामहिम हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते संभाजीनगर येथील एकनाथ रंगमंदिर येथे करण्याचे आयोजित केले आहे. १९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३ वाजता हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी माननीय महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे, राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाठ, कॅबीनेटमंत्री अतुलजी सावे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, मा. पालकमंत्री तथा मंत्री खासदार सांदिपान भुमरे पाटील, माजी खा. इम्तियाज जलील, आ. प्रदीप जैस्वाल, आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रशांत बंब, राष्ट्र संत रामगिरीजी महाराज, मराठवाड्यातील आय ए. एस./ आय पी एस अधिकारी यांचीही उपस्थिति राहणार आहे. आदर्श प्रशासकीय सेवा राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्काराचे पत्र देताना सं. अ. लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य चे बीबी वैद्य, प्रदेश सहसचिव सुनील महाकुंडे, प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी आदी दिसत असून तहसीलदार शेळके साहेब यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होतं आहे.






## पोलिसांची लेक बनली डॉक्टर झाली

बीड | प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलामध्ये वडील कार्यरत २४ तास विमानत्वारे नोकरी करणारे आप्पा नावाचे वाहन चालक हे बीड जिल्ह्यामध्ये नामांकित आहेत यांनी या अगोदर बीड जिल्ह्यामध्ये आपले कर्तव्य बजावत असताना सर्वसामान्य गोरगरीब जनतेला सदैव आधार देण्याचे काम केलेले आहे आता सध्या येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात चालक असलेले शिवाजी खवतड यांच्या लेक शिवानी हिने जिद्द व चिकाटीने अभ्यास करुन एमबीबीएस परीक्षेत यश संपादन करुन कुटुंबाचे स्वप्न साकार केले. यामुळे शिवानी आणि खवतड परिवारावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. शिवानी शिवाजी खवतड चे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण हे बीड शहरातच झाले. ती अभ्यासात हुशार असल्याने तिने डॉक्टर व्हावे अशी आई-वडील व कुटुंबाचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी तिने जिद्द आणि चिकाटीने अभ्यास केला. मामर मेडिकल कॉलेज तळेगाव दाभाडे (जि.पुणे) येथे एमबीबीएस पूर्ण केले. शिवानी शिवाजी खवतड हिने कुटुंबाचे स्वप्न साकार केले.

## महिलांनी उद्योजक व्हावे ही माहेश्वरी समाजाची भूमिका प्रेरणादायी : सचिन मुळूक

### पद्माक्षी प्रदर्शनाचे बीडमध्ये मुळुक यांच्या हस्ते उद्घाटन

बीड | प्रतिनिधी

माहेश्वरी समाजातील आयोजक पद्मा ताई हेमंत बियाणी, मीनाक्षी ताई अमित सिकची यांनी पद्माक्षीच्या माध्यमातून महिलांना उद्योजक बनण्यासाठी नवीन व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. समाजातील महिलांनी केवळ चार भिंतीपुरते मर्यादीत न राहता त्यांनी उद्योजक बनावे ही माहेश्वरी समाजाची भूमिका खरोखरच प्रेरणादायी आहे आसे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.




माहेश्वरी समाजातील महिलांच्या वतीने शनिवारी (दि.५) शहरातील बालाजी मंदिर येथे आयोजित पद्माक्षी प्रदर्शनाचे उद्घाटन मुळूक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या प्रदर्शनात बारा जिल्ह्यातील महिला वितरक सहभागी आहेत. कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, आयोजक पद्मा ताई हेमंत बियाणी, मीनाक्षी ताई अमित सिकची, जगदीश सिकची उपस्थित होते. यावेळी मुळूक म्हणाले की जन्मजात अंगी असणारी विविध कौशल्ये आणि क्षमतांचा विकास साधत महिला प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करुन दाखवत आहेत. महाराष्ट्रातील गरजू महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी शिवसेना कायम प्रयत्नशील आहे.

पद्माक्षी प्रदर्शनाच्या निमित्ताने माहेश्वरी समाजाने स्त्रियांना गृहउद्योगातून स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न कौतूकास्पद असून या समाजाने सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. असे कार्यक्रम वारंवार होणे गरजेचे आहे. महिला सक्षमीकरणासाठी आणि उद्योजक होऊन स्वकर्तृत्व सिध्द करणाऱ्या महिलांच्या पाठिशी शिवसेना कायम उभी असल्याचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले. कार्यक्रमास बाहेती सर, सारडा सर, कासटताई, बियाणी ताई, शांता ताई सिकची तसेच गृह उद्योजक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




## भाजपाचा स्थापना दिन परळीत उत्साहात साजरा

### ना. पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयासमोर झेंडावंदन; कार्यकर्त्यांनी पेढे वाटून केला आनंदोत्सव

परळी | प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस शहरात आज उत्साहात साजरा करण्यात आला. राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी झेंडावंदन करून तसेच फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.

६ एप्रिल भाजपाचा आजचा स्थापना दिवस ना. पंकजाताई मुंडे यांच्या अरुणोदय मार्केटमधील संपर्क कार्यालयात अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. स्थापना दिनानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया यांच्या हस्ते भाजपच्या ध्वजाचे झेंडावंदन करण्यात आले. तत्पूर्वी ज्येष्ठ नेते शामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, लोकनेते गोपीनाथराव मुंडे, प्रमोद महाजन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व पेढे वाटून एकमेकांना स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

दुपारी २ वा. कार्यालयात संघटन पर्व अंतर्गत मोठा स्क्रीन लावून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाचा कार्यकर्त्यांनी लाभ घेतला. यावेळी सतीश मुंडे, जुगलकिशोर लोहिया यांच्यासह प्रकाश जोशी, राजेश्वर देशमुख, महादेव इटके, राजेंद्र ओझा, नितीन समशेट्टे, मोहन जोशी, अनिश अग्रवाल, बंडू कोरे, अच्युत जोगदंड, चंदाताई ठोंबरे, राजेश कौलवार, सुशील हरंगुळे, अभिमान मस्के, विकास हालगे, मिलिंद कांबळे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

**ना. पंकजाताई मुंडे यांचा मुंबईत कार्यकर्त्यांशी संवाद व आरोग्य शिबीराला भेट**

भाजपच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईतील माहीम विधानसभा मतदारसंघात आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीराला ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट देऊन याठिकाणी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधला. तसेच महिला उद्योजिकांकरिता लावण्यात आलेल्या विनामूल्य स्टॉल्सशी पाहणी केली. स्थापना दिनानिमित्त लोकोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच याप्रसंगी मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाचा त्यांनी कार्यकर्त्यांसमवेत लाभ घेतला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT